MHRG190008112023

:: **<u>भुसंपादन निर्देशन अर्ज क्र.१०९/२०२० मधील निशाणी क्रमांक १५ खालील आदेश</u>** ::

प्रस्तुत अर्जाद्वारे सामनेवालाने 'विना कैफियत' आदेश रद्द करणेबाबत विनंती केली.

०२. अर्ज व अर्जदाराने दिलेले म्हणणे वाचले. सामनेवाला क्र.३ तर्फे विद्वान वकील श्रीमती डी.ए.कामत व अर्जदारातर्फे विद्वान वकील श्री.बी.टी.नवाळे यांचा युक्तीवाद ऐकला.

०३. सामनेवाला क्र. ३ चे कथन की, सामनेवाला क्र.३ यांना दिनांक ११.१२.२०२४ रोजी समन्स प्राप्त झाले असुन दिनांक १२.१२.२०२४ रोजी न्यायालयात हजर झाले. अर्जातील मिळकतीचे संपादन व निवाडा झाला असल्याने सामनेवाला क्र.१ व २ यांचेमार्फत म्हणणे व कैफियत दाखल करणेकरिता आवश्यक असणारी माहिती व कागदपत्रे वेळेवर उपलब्ध न झाल्याने म्हणणे व कैफियत दाखल करण्यास विलंब झाल्यामुळे सामनेवाला क्र.३ यांचेविरुध्द दिनांक २०.०३.२०२५ रोजी विना कैफियत आदेश पारीत करण्यात आला. सामनेवाला क्र.३ यांनी कैफियत दाखल करण्यास जाणुनबुजुन विलंब केलेला नाही. सामनेवाला क्र.३ यांचे म्हणणे व कैफियत दाखल होणे अर्जाचे अंतिम न्यायाचे दृष्टीने आवश्यक आहे व सामनेवाला क्र.३ यांचे कधीही भरुन न येणारे असे अपरिमित नुकसान होणार आहे तरी नैसर्गिक न्यायतत्वाचा विचार करता सदर सामनेवाला क्र.३ यांना सदर अर्जाकामी कैफियत देणेकामी झालेला विलंब माफ करुन विना कैफियत आदेश रद्द करुन सामनेवालाचे म्हणणे अभिलेखावर घेणे आवश्यक आहे. सबब, अर्ज मंजुर करावा अशी विनंती केली.

०४.          अर्जदाराने सामनेवाला क्र.३ च्या प्रस्तुतच्या अर्जास सक्त हरकत नोंदवुन अर्ज नामंजुर करण्याची विनंती केली आहे.

०५.          अर्ज, अर्जाला दिलेले म्हणणे व परस्पर विरोधी युक्तीवादाचे विवेचन करण्यात आले. प्रस्तुत अर्जान्वये अर्जदाराने भुसंपादित जमिनीच्या वाढीव मोबदल्याची मागणी केली आहे. अर्जाचे स्वरुप पाहता सामनेवाला क्र.१ ते ३, तसेच अर्जदार यांचे प्रस्तुत वादामध्ये आर्थिक हितसंबंध गुंतलेले असल्याचे स्पष्ट होते. सामनेवाला क्र.३ ने अर्जात हजर होऊन मुदतीत कैफियत का देता आली नाही, याबद्दल दिलेले अर्जामधील कारण संयुक्तीक आहे. अर्जाचे स्वरुप पाहता सामनेवाला क्र.३ ला त्याची बाजु मांडण्याची संधी देणे न्यायोचित ठरते. सामनेवाला क्र.३ विरुध्द प्रकरण विना कैफियत चालविण्याचा झालेला आदेश रद्द करुन कैफियत दाखल करण्याची परवानगी दिल्यास अर्जदाराचे कोणतेही नुकसान होणार नाही. याउलट अर्जाचा निकाल गुणदोषावरुन उभय पक्षातील वादाला पुर्णविराम मिळेल. सबब, चर्चिल्या बाबी लक्षात घेता अर्ज मंजूर होण्यास पात्र ठरतो, असा निष्कर्ष नोंदवुन खालील आदेश पारित करण्यात येतो.

**:: <u>आदेश</u> ::**

१.     अर्ज मंजूर करण्यात येतो.

२.     सामनेवाला क्र.३ विरुध्द दिनांक २०.०३.२०२५ रोजी पारित झालेला विना विनाकैफियत आदेश रद्द करण्यात येतो व अर्जास कैफियत दाखल करण्याची परवानगी देण्यात येते.

३.     खर्चाबाबत कोणताही आदेश नाही.

JADHAV HEMLATA RAVINDRA

Digitally signed by JADHAV HEMLATA RAVINDRA
Date: 2025.09.11 17:43:19 +0530

महाड

दिनांकः११.०९.२०२५

**(एच. आर. जाधव)**

दिवाणी न्यायाधीश व.स्तर, महाड